**ठळक बातम्या**

- हवामान बदलाचा सामना करण्यासाठी भारत वचनबद्ध असून त्या दिशेने ठोस पावलं उचलत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- गुजरातमधे लोथल इथं प्रस्तावित राष्ट्रीय समुद्री नौकानयन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं केंद्रीय बंदर विकास मंत्र्यांच्या हस्ते अनावरण
- आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारताच्या धीनिधी देसंगु  हिने चारशे मीटर पोहण्याच्या स्पर्धेत नोंदवला नवा राष्ट्रीय विक्रम
- 'मोंथा'  चक्रीवादळ  आज मध्यरात्रीच्या सुमारास ताशी ९० ते १०० किलोमीटर वेगाने  आंध्रप्रदेशच्या किनाऱ्यावर धडकण्याची शक्यता.

**आणि**

- ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांचं निधन

**<><><><><>**

भारत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असून त्या दिशेने ठोस पावलं उचलत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत आयएसए अर्थात आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या आठव्या अधिवेशनाला संबोधित करत होत्या. हवामान बदलाचा संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होत आहे. त्याचा सामना करण्यासाठी तातडीने आणि ठोस पावलं उचलण्याची गरज असून त्यासाठी सूर्य हा सौर उर्जेचा शाश्वत स्रोत महत्त्वाचा असल्याचं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**होल्ड... बाईट - राष्ट्रपती**

अनेक देशवासीय आज छठपूजेच्या निमित्ताने सूर्याचं पूजन करत आहेत. याच काळात सुरू झालेलं हे अधिवेशन म्हणजे खऱ्या अर्थाने सौर उर्जेसाठीच्या जागतिक सहकार्याचं प्रतीक असल्याचं नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले.

पुढचे चार दिवस चालणाऱ्या या संमेलनात १२४ देशातले विविध विभागांचे प्रतिनिधी आणि ४०हून अधिक देशांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत. सौर उर्जा क्षेत्रात जागतिक समुदायातलं सहकार्य वाढवण्यासाठी तसंच उज्ज्वल आणि शाश्वत भविष्यासाठी सौरऊर्जेच्या वापराला गती देण्यासाठी तसंच सर्वांना परवडणाऱ्या दरात सौरऊर्जा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उपाययोजना करण्यासंदर्भात चर्चा होणार आहेत.

**<><><><><>**

सेशेल्सचा दौरा पूर्ण करून उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज मायदेशी परतले. सेशेल्सचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्या शपथविधी समारंभात सहभागी होण्यासाठी ते सेशेल्स इथे गेले होते. या भेटी दरम्यान राधाकृष्णन यांनी हर्मिनी तसंच उपाध्यक्ष सबॅस्टियन पिल्लई यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी भारत आणि सेशेल्स दरम्यानच्या महासागर अर्थात म्युच्युअल अँड होलिस्टिक ॲडव्हान्समेंट फॉर सिक्युरिटी अँड ग्रोथ ॲक्रॉस रिजन्स धोरणाविषयी चर्चा केली. तसंच, ग्लोबल साऊथ म्हणजेच विकसनशील देशांसाठी भारताचं सहकार्य कायम राहील याचा पुनरुच्चार केला. या भेटीत राधाकृष्णन यांनी मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र रामगुलाम यांचीही भेट घेतली.

**<><><><><>**

गुजरातमधे लोथल इथं प्रस्तावित असलेल्या राष्ट्रीय समुद्री नौकानयन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं अनावरण आणि संशोधन अहवालाचं प्रकाशन केंद्रीय बंदरं, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते आज

मुंबईत इंडिया मेरिटाईम वीकच्या दुसऱ्या दिवशी झालं. भारताचा समुद्री नौकानयन क्षेत्रातला हजारो वर्षांचा प्रवास हा फक्त भारताचा नसून सर्व खंडांमधला परस्पर आदर आणि भागीदारीचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. समुद्री नौकानयन वारसा दिनाचं उद्घाटनही सोनोवाल यांनी केलं. लोथलमधलं हे संकुल आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ होईल, तसंच समुद्री नौकानयन क्षेत्रात नवनिर्मिती करण्यासाठी नव्या पिढीला प्रोत्साहन देईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. भारताचा समुद्री नौकानयन इतिहास हजारो वर्षांचा असून तो जपायला मंत्रालय वचनबद्ध आहे, अशी ग्वाही बंदरं, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांनी दिली.

**<><><><><>**

भारताची स्मार्ट फोन निर्यात गेल्या महिन्यात विक्रमी १ अब्ज ८० कोटी अमेरिकी डॉलर्सवर पोहोचली, असं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. देशातून निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनं तिसऱ्या क्रमांकावर असल्याचं सांगत वैष्णव यांनी नॅशनल डेली या दैनिकातला एक लेख समाज माध्यमावर सामायिक केला. देशभरात इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचं उत्पादन सुरु झाल्यानं हजारो रोजगार निर्माण होतील, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांकडून निवडणूक प्रचार जोरात सुरू आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महाआघाडीचे घटक पक्ष मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न करत आहेत. महाआघाडीचा जाहीरनामा आज प्रसिद्ध होणार असून यात आपली धोरणं जाहीर करण्यात येतील असं राजद नेते तेजस्वी यादव यांनी सांगितलं. राओलाची धोरणं, आणि मुख्यमंत्रपदाच्या उमेदवाराच्या नावावर यादव यांनी प्रश्न उपस्थित केले.

राष्ट्रीय जनता दल हा पक्ष फक्त एकाच कुटुंबासाठी काम करतो. मात्र, सरकार सब का साथ सबका विकास या तत्वावर चालतं असं प्रत्यूत्तर लोक जनशक्ती पार्टी रामविलासचे प्रमुख आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी यादव याना दिलं. संयुक्त जनता दलाचे प्रवक्ते राजीव रंजन यांनीही महाआघाडीवर खोटी आश्वासनं दिल्याचा आरोप केला असून मुख्यमंत्री नीतिश कुमार शब्दांपेक्षा आपल्या कामातून बोलत असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

बहारीन इथं आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारताच्या धिनिधी देसंगु हिने चारशे मीटर पोहण्याच्या स्पर्धेत नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे. धिनिधीने हे अंतर चार मिनिट २१ सेकंद ८६ मिनीसेकंदात पार करत अंतिम फेरीत पाचवं स्थान पटकावलं. तसंच स्वतःचाच चार मिनिट २४ सेकंद ६० मिनीसेकंदाचा विक्रम मोडीत काढला. याच स्पर्धेत भारताच्याच अदिती हेगडेनं चारशे मीटरचं अंतर चार मिनिट ३२ सेकंदात पार करत सातवं स्थान पटकावलं.

पुरुषांच्या जलतरण स्पर्धेत भारताच्या नितीशसाई हरिनाथ याने ५० मीटरचं अंतर २३ सेकंद ७२ मिनीसेकंदात पूर्ण केलं. तर दक्षन शशीकुमार यानं चारशे मीटर अंतर चार मिनिट ८७ मिनीसेकंदात पार केलं.

<><><><><>

सर्बिया इथं काल झालेल्या २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत सुजीत कलकलने पुरुषांच्या ६५ किलो गटात सुवर्णपदक जिंकले. त्याने विजेतेपदाच्या लढतीत उझबेकिस्तानच्या खेळाडूचा १०-० असा पराभव केला. यापूर्वी, भारतीय महिला कुस्ती संघानं पाच कांस्य आणि दोन रौप्य पदके जिंकली असून सांघिक विजेतेपदही पटकवले आहे.

<><><><><>

सूर्यपूजेचा लोक उत्सव म्हणून ओळखला जाणाऱ्या छठ उत्सवाचा आज सकाळी उगवत्या सूर्याला प्रार्थना करून, श्रद्धा, भक्ती आणि आनंदाच्या वातावरणात समारोप झाला. महिलांनी नद्या, तलाव आणि जलाशयांमध्ये उभे राहून सूर्यदेवाला प्रार्थना केली. कार्तिक शुक्ल षष्ठीला बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेशच्या पूर्वेकडील भागात छठपूजा साजरी केली जाते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छठ पूजेत सहभागी झालेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. छठी मैय्याच्या कृपेने देशवासियांचं जीवन सदैव उजळत राहो, अशा शब्दात समाज माध्यमावर प्रधानमंत्र्यांनी भावना व्यक्त केली.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं 'मोंथा' चक्रीवादळ  आज अधिक तीव्र झालं असून ताशी ९० ते १०० किलोमीटर वेगानं ते आज मध्यरात्रीच्या सुमारास आंध्रप्रदेशच्या काकीनाडा जिल्ह्यात मछलीपट्टण ते कलिंगपट्टणच्या दरम्यान थडकण्याची शक्यता आहे.

श्रीकाकुलम, विजयनगरम, विशाखापट्टणम, अनकापल्ली, पूर्व गोदावरी, कोनासीमा, काकीनाडा, कृष्णा, नेल्लोर आणि प्रकाशम जिल्ह्यांमध्ये  मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे वाहत आहेत. सखल भागात पाणी साचलं असून वाहतुकीवर परिणाम झाला आहे. शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्यात आली आहेत आणि अत्यावश्यक सेवा वगळता बहुतेक दुकाने बंद ठेवण्यात आली आहेत. अनेक रेल्वे आणि विमान सेवा रद्द करण्यात आल्या आहेत. मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये, असा इशारा देण्यात आला आहे. आंध्रचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नायडू यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि केंद्रीय मदतीचं आश्वासन दिलं.

आतापर्यंत ३५ हजाराहून अधिक लोकांना मदत छावण्यांमध्ये हलवण्यात आलं आहे. दक्षिण मध्य पूर्व किनारी रेल्वे आणि विविध विमान सेवा रद्द करण्यात

आल्या आहेत. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि विशेष पथकं बचाव कार्यासाठी सज्ज आहेत.

दक्षिण ओडिशाचा किनारी भाग आणि छत्तीसगडला उद्यापर्यंत अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

ओडीशा, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ या राज्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

या परिस्थितीच्या अनुषंगानं ओडीशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी आज भुवनेश्वरमध्ये आपत्कालीन बैठक बोलावली आहे आणि परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यातील दक्षिणेकडील आणि किनारी जिल्ह्यांमध्ये अग्निशमन सेवा, ओडिशा आपत्ती जलद कृती दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांचं काल रात्री मुंबईत निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात येतील.

सर्वार्थाने गाजलेल्या "वस्त्रहरण"चे नाटककार म्हणून गवाणकर ओळखले जातात. मालवणी बोलीभाषेला आणि लोकनाट्याच्या बाजाला मुख्य प्रवाहातल्या रंगभूमीवर मानाचं स्थान मिळवून देण्याचं श्रेय या नाटकाला जातं. या नाटकाचे ५ हजार ४०० हून जास्त प्रयोग झाले आहेत. मुंबईत सुरुवातीचे दिवस स्मशानभूमीत काढणारे गवाणकर यांनी महानगर टेलिफोन निगममधे नोकरी करता करता लेखनाचा छंद जोपासला. त्यांचं "वात्रट मेले" हे नाटकही प्रचंड लोकप्रिय ठरलं. "वर भेटू नका", "दोघी", "वनरुम किचन" ही नाटकं, "ऐसपैस" ही कादंबरी तसंच रविंद्रनाथ टागोरांच्या कथांचा अनुवाद - "चित्रांगदा" त्यांच्या नावे जमा आहेत. ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं.

गवाणकर यांच्या निधनाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**//<><><><><>//**